**विशेष दिवाणी दावा क्र. २६/२०२०**

**युसुफ अली व इतर वि. लैलाबी व इतर**

## निशाणी २१ वर आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र. १, ३ व ४ यांनी त्यांचे विरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द करुन त्यांची कैफियत स्विकारावी या मागणीसाठी सादर केला आहे. अर्जातील कथनाचे बारकाईने वाचन केले. वादीच्या वतीने अर्जावर दाखल केलेले म्हणणे विचारात घेतले असता प्रतिवादी यांना दावा समन्स हे दिनांक ७.११.२०२० रोजी तामील झालेले असुन ते हेतुपुरस्सर गैरहजर राहिलेले आहेत. अर्जात गैरहजेरीबाबत सबळ कारण नाही. अर्ज हा मुदत बाहय आहे, त्यामुळे तो खारीज करण्यांत यावा असे म्हणणे मांडले आहे.

दोन्ही पक्षांचे म्हणणे विचारात घेउन दाव्यातील मागणी विचारात घेतली. प्रकरणाचे स्वतरुप व त्यात न्यायनिर्णयासाठी अंतर्भूत असलेले मुद्दे विचारात घेता गुणवत्तेवर न्यायनिर्णय होण्यांसाठी प्रतिवादींना कैफियत सादर करण्यांची संधी मिळणे आवश्यक व न्यायोचीत दिसुन येत असल्याने अर्जातील कारणे विचारात घेता अर्ज मंजुर करण्यांत येतो व प्रतिवादींची कैफियत स्विकारण्यांत येते.

(आर.एम. कराडे),
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
वैजापुर.

17/03/23

दिनांक – १७.०३.२०२३.